सकाळ ॲग्रोवन
शुक्रवार, ३० ऑगस्ट २०२४

# रब्बी ज्वारी लागवडीसाठी योग्य वाणाची निवड

डॉ. आदिनाथ ताकटे, डॉ. विजू अमोलिक

**सी. एस. व्ही. २२**

- भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती जमिनीसाठी शिफारस
- पक्व होण्याचा कालावधी : ११६ ते १२० दिवस

**वैशिष्ट्ये**

- दाणे मोत्यासारखे चमकदार, भाकरीची चव चांगली
- खोडमाशीस प्रतिकारक्षम
- कोरडवाहू क्षेत्र : धान्य उत्पादन हेक्टरी २४ ते २८ क्विंटल, कडबा उत्पादन ६५ ते ७० क्विंटल
- बागायती क्षेत्र : धान्य उत्पादन हेक्टरी ३० ते ३५ क्विंटल, कडबा उत्पादन : ७० ते ८० क्विंटल

**फुले पूर्वा (आरएसव्ही २३७१)**

- प्रसारण वर्ष २०२३
- जिरायती भागातील काळ्या जमिनीसाठी शिफारस
- पक्वता कालावधी : ११८ ते १२० दिवस

**वैशिष्ट्ये**

- पाण्याचा ताण सहन करणारा
- न लोळणारा
- काढणीस सुलभ
- पांढरे शुभ्र टपोरे व गोलाकार दाणे
- धान्य उत्पादन : हेक्टरी २३.८ क्विंटल. कडबा उत्पादन : ६९.२ क्विंटल

**परभणी मोती**

- भारी जमिनीकरिता कोरडवाहू व बागायती पेरणीसाठी उपयुक्त
- पक्व होण्याचा कालावधी : १२५ ते १३० दिवस

**वैशिष्ट्ये**

- दाणे मोत्यासारखे, पांढरेशुभ्र चमकदार
- खोडमाशीस प्रतिकारक्षम
- कोरडवाहू : धान्य उत्पादन : हेक्टरी १७ क्विंटल, कडबा उत्पादन ५० ते ६० क्विंटल
- बागायती : धान्य उत्पादन : हेक्टरी ३२ क्विंटल, कडबा : ६० ते ७० क्विंटल

**फुले रेवती**

- भारी जमिनीत बागायतीसाठी शिफारस
- पक्व होण्याचा कालावधी : ११८ ते १२० दिवस

**वैशिष्ट्ये**

- दाणे मोत्यासारखे, पांढरे चमकदार
- भाकरीची चव उत्कृष्ट
- कडबा पौष्टिक व अधिक पाचक
- धान्य उत्पादन : हेक्टरी ४० ते ४५ क्विंटल, कडबा ९० ते १०० क्विंटल

**पी.के.व्ही. क्रांती**

- मध्यम ते भारी जमिनीकरिता, कोरडवाहू आणि बागायती पेरणीसाठी उपयुक्त.
- पक्वता कालावधी : १२० ते १२२ दिवस

**वैशिष्ट्ये**

- दाणे मोत्यासारखे चमकदार
- भाकरीची प्रत व चव उत्तम
- खोडकीड, खोडमाशीला काही प्रमाणात प्रतिकारक



पीकेव्ही क्रांती हे रब्बी ज्वारीचे वाण.

- धान्य उत्पादन : हेक्टरी २५ ते ३० क्विंटल, कडबा ७० ते ७५ क्विंटल.

**मालदांडी ३५-१**

- मध्यम खोल जमिनीत कोरडवाहूसाठी शिफारस
- पक्व होण्याचा कालावधी : ११८ ते १२० दिवस

**वैशिष्ट्ये**

- दाणे चमकदार, पांढरे
- भाकरीची चव चांगली
- खोडमाशीला प्रतिकारक्षम
- धान्य उत्पादन : हेक्टरी १५ ते १८ क्विंटल, कडबा ६० क्विंटल

## लागवड

- कोरडवाहू रब्बी ज्वारीची पेरणी १५ सप्टेंबर ते १५ ऑक्टोबर या कालावधीत जमिनीत पुरेशी ओल असल्यास करावी.
- शक्यतो हस्ताचा पाऊस पडून गेल्यावर म्हणजेच २५ सप्टेंबर ते १० ऑक्टोबर या दरम्यान पेरणी करणे हिताचे आहे. योग्य वेळी पेरणी न झाल्यास खोडमाशीचा प्रादुर्भाव अधिक होतो.

**बीजप्रक्रिया**

- पेरणीपूर्वी बियाण्यास गंधकाची प्रक्रिया करावी. त्यासाठी १ किलो बियाण्यांस ३०० मेष गंधकाची ४ ग्रॅम प्रमाणे बीजप्रक्रिया करावी. त्यामुळे कानी या रोगाचा प्रादुर्भाव टाळण्यास मदत होते. गंधकाची प्रक्रिया केल्यानंतर १० किलो बियाण्यांस प्रत्येकी २५० ग्रॅम ॲझेटोबॅक्टर व पीएसबी या जिवाणू संवर्धकाची प्रक्रिया करावी.
- **बियाणे प्रमाण** : हेक्टरी १० किलो

**पेरणी**

- ज्वारीची पेरणी दोन चाड्याच्या पाभरीने ४५ बाय १५ सेंमी अंतरावर करावी.
- पेरणी करताना एकाच वेळी खते व बियाणे स्वतंत्र दोन चाड्यातून पेरावे.
- बागायत ज्वारीचे अपेक्षित उत्पादन मिळविण्यासाठी पेरणी ४५ बाय १२ सेंमी अंतरावर करावी.
- कोरडवाहू ज्वारीसाठी दोन रोपांत २० सेंमी अंतर ठेवावे.
- पेरणीच्या वेळी संपूर्ण नत्र, स्फुरद व पालाश द्यावे.

- डॉ. आदिनाथ ताकटे, ९४०४०३२३८९
- डॉ. विजू अमोलिक, (वरिष्ठ ज्वारी पैदासकार)
९४२१५८३५०६
(महात्मा फुले कृषी विद्यापीठ, राहुरी)